## लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतीशकुमार देवकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतीशकुमार देवकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा गौतम जाधव यांनी केले. यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचे प्रयोजन सांगताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. त्यानंतर बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतीशकुमार देवकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक व राजकीय कारकीर्दीचा आढावा घेत आजच्या स्त्रीवादी सुधारणा चळवळीसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायक असल्याचे मत व्यक्त केले.यावेळी प्रा अंकुश गोरट्याल,प्रा डॉ सुप्रतिक पाल चौधरी, प्रा डॉ प्रशोनजीत चक्रवर्ती, प्रा कार्तिकी वेदपाठक, प्रा साक्षी बिराजदार, प्रा श्वेता बाचके, श्री मनोहर कोकणे, प्रयोगशाळा सहाय्यक कु.मनोज लोंढे,कु.अनिकेत ननवरे,कु.पल्लवी गोटे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा कविता संभारम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा अमृता नन्नवरे यांनी केले.

